PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 2, ISSUE 1

# ठाणेगावच्या हेमाडपंथी जगदंबा मंदिराचा ऐतिहासिक अभ्यास

**प्रा. डॉ. चंद्रशेखर क्षिरसागर**
इतिहास विभाग प्रमुख
राणी लक्ष्मीबाई महिला
महाविद्यालय सावरगांव
**महाराष्ट्र भारत**

**प्रस्तावना –**

वर्धा जिल्हयातील कारंजा तालुक्याच्या पूर्व भागास जवळ जवळ ७ कि.मी. अंतरावर ठाणेगाव नावाचे एक छोटेशे प्राचीन गाव आहे. या गावातील नाल्याच्या काठावर जगदंबा मातेचे एका काळया पाषाणात कोरलेले एक मंदिर आहे. त्या मंदिराला परकोट असुन त्याची बांधनी हेमाडपंथी स्थापत्य पदध्तीने झाली. मंदिराचे नाव जगदंबा मंदिर असले तरीही गर्भगुहात असलेल्या शिवलिंगावरुन हे शंभुराजाचे मंदीर असावे असे दिसुन येते. दरवर्षी नवरात्री आणि महाशिवरात्री तसेच श्रावण महिण्यामध्ये येथे यात्रा भरते. आजुबाजूचे भावीक मंदिरात येऊन जगदंबा मातेचे आणि शिवलिगांचे दर्शन घेतात.

**संशोधन पध्दती व साधने –**

प्रस्तुत शोधनिबधासाठी ऐतीहासीक संशोधन पध्दतीचा वापर केला असुन प्रत्यक्ष निरीक्षण आणि प्राथमिक व दुय्यम सांधनाच्या माध्यमातुन हा श्शोध निबंण पुर्णत्वास आलेला आहे.

**संशोधनाची उद्दीष्टे –**

१. ठाणेगाव येथील जगदंबा मंदिराच्या स्थापत्य श्शैलिचा अभ्यास करणे.

२. जगदंबा मातेच्या मंदिराच्या इतिहासावर प्रकाश टाकने.

३. जगदंबा मातेच्या मंदिरासंबधी लोकसमजुतीचा आढावा घेणे.

४. ठाणेगावच्या जगदंबा माता मंदिराचा वास्तव इतिहास अभ्यासकापुढे विषद करणे.

विषय विवेचन— पुर्व विदर्भातील वर्धा जिल्हयाला अगदी पुरान काळापासुनची ऐतीहासीक पार्श्वभुमी लाभलेली आहे. वर्धा जिल्हयातील कारंजा तालुक्यात ठाणेगाव हे साधारणत: ५००० लोकवस्तीचे एक छोटेसे गाव. नागपुर अमरावती राष्ट्रीय महामार्गा क्रमांक ६ वर वसलेले आहे. या गावाच्या ईशान्य भागाला असलेल्या नाल्याच्या काठावर एक काळया दगडापासुन बांधलेले अतिशय देखने मंदिर आहे. त्या मंदिराला जगदंबा देवीचे मंदिर म्हणून ओळखले जात असले तरीही मंदिराच्या गर्भगृहाच्या मध्यभागी असलेल्या शिवलींगावरुन हे एक शिवमंदिर असावे असे वाटते. या मंदिराला सभोवताली एक काळया दगडाचा परकोट बांधलेला आहे. त्याला एक भव्य प्रवेशव्दार असुन ते ३.६० मी. ग ३.०२ मी. आकाराचे काळया दगडापासुनच तयार केलेले आहे. परकोट आणि मुख्य मंदिराच्या मध्ये एक नंदी मंडप असुन त्याचा आकार २.३२मी ग २.२८मी लांब रुंद आहे. त्या सभामंडपाच्या मध्यभागी पश्चिमाभीमुखी नंदीची काळा दगडाची मोठी मुर्ती आहे. या सभामंडपाच्या पश्चिम बाजुला थोडया अंतरावर जगदंबा देवीचे मुख्य मंदिर आहे. या मंदिराचा आकार १५.३६मी ग ८.८०मी. लांब रुंद आहे. मंदिराच्या आत मंडपव्दार, दाराच्या आत सभामंडप आणि समोरच गर्भगृह असून गर्भगृहाच्या मध्यभागी एक शिवलींग आहे.

पुर्वमुखी असलेल्या मंदिराच्या आत जाण्यासाठी तिन व्दार असुन मुख्य व्दार पुर्व बाजुला तर उरलेले दोन व्दारे उत्तर आणि दक्षिण बाजुस आहे. त्यापैकी मुख्य व्दार मोठे आणि कोरिव पध्दतीने सुशोभित आणि अतंकृत केलेले दिसते. मंदिराच्या आतील सभामंडप ६.४१मी. लांब आणि ५.९८मी. रुंद आहे. सभामंडपात १४ काळया दगडापासून तयार केलेले कोरिव सुंदर मोठे स्तंभ आणि १० सुंदर असे अंर्ध स्तंभ आहे. त्यापैकी ८ स्तंभाचा आकार २.५८मी ग २.५५मी. चौरस आहे. मंदिराला प्रदक्षिणा घालण्यासाठी गर्भगृहाभोवती मोकळी जागा आहे. मंदिराच्या पश्चिमेकडील भिंतीला दोन्ही बाजुस दोन देवकोट कडे आहेत.

मंदिराच्या गर्भगृहाचा दरवाजा १६२ सेंटिमीटर उंच आहे. हे व्दार उंचावर असुन मध्यभागात चंद्रशिला व दोन्ही किर्तीमुखाचे अलंकरण आहे. गर्भगृहात उतरण्यासाठी चार दगडी पायऱ्या आहे. खाली उतरल्यावर २.५३मी. आणि २.५१ असा चौरस आकाराचा हॉल आहे. मध्य भागी ६३ सेंटीमीटर व्यासाच्या काळया दगडात १९ सें.मी. व्यासाची पिंड कोरलेली आहे. गर्भगृहाच्या पश्चीम भिंतीत देवकोष्ट आहे. गर्भगृहाचे छत ४ मिटर उंचीचे असुन सभामंडपापेक्षा गर्भगृहाची रचना खोलीवर करण्यात आली आहे.

गर्भगृहाच्या बाहेरील भिंत खाचा खाचाची असुन ठिकठिकाणी कोनाडे असलेले दिसते. मंदिराचे छत दगडी पाटयांनी काटकोनात रचुन तयार केलेले आहे. तर मंदिराचा पृष्ठभागाची रचना सुध्दा दगडी पाटयातुनच तयार केलेली आहे. या दगडी पाटया दगडांना कोरीव आकार देवून तयार केलेल्या दिसते. हे जगदंबा मंदिर जागृत असुन परिसरातील लोकांचे श्रध्दा स्थान आहे.

## निष्कर्ष —

१. या मंदिराचे बांधकाम इ.स. १२—१३ व्या शतकातील असावे.

२. मंदिराच्या बांधकामात उभ्या दगडाचा वापर केला आहे. परतुं अलीकडील काळात करण्यात आलेल्या पोताई मुळे मंदिराचे मुळ वैभव नष्ट होत आहे.

३. हे मुळ शिव मंदिर असुन गर्भगृहातील भिंतीवर देवीची मुर्ती बसवलेली आहे.

४. मंदिराचे बाधंकाम दगडावर दगड रचुन करण्यात आले आहे.

५. मंदिरातील खांब अखंड उभ्या दगडापासुन आडवे आले आहे.

६. हे मदिंर हेमाडपंथी असले तरी ही मंदिराचा कळस अलिकडच्या काळातील असल्याचे जाणवते.

७. मंदिराची जागृती केल्यास पर्यटनाला विशेष चालना मीळू शकते.

८. पुरातत्व खात्याने या मंदिराला सुरक्षीत करून त्याच्या संवर्धनाकडे लक्ष पुरवावे. तसेच हा ऐतीहासीक व सांस्कृतीक ठेवा भावी पिढीसाठी वारसा जतन करुन ठेवण्याची गरज आहे.

## संदर्भसुची —

१. महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, नागपूर जिल्हा भाग १ व भाग २ (१९९९)

२. महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, वर्धा जिल्हा (१९९२)

३. टेंभेकर, डॉ. नलीनी— पुर्व विदर्भातील ऐतीहासीक व प्रेक्षणीय स्थळे.

४. वेरूळकर विजय— विदर्भातील जेजुरी, हिंगणघाट मल्हारी मार्तंड मंदिर समुह, विदर्भ

५. जामखेडेकर,अ.प्र विदर्भ संशोधन मंडळ वार्षीक —१९७४

६. कोळाकर, श.गो— विदर्भ इतिहास— विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर १९९७

७. काळे, या. मा– वऱ्हाडचा इतिहास, बुलढाणा १९२४

८. लांडगे, देविदास गोविंदा– संशोधनांजली, विदर्भ संशोधन मंडळ नागपूर, १९६०

९. प्रत्यक्ष पाहणी दि. १/११/२०१६

१०. ठाणेगाव ग्रामवासीयांच्या मुलाखती.